# ठाणे महानगरपालिका,ठाणे.

नौपाडा प्रभाग समिती.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक - २०.१२.२०१०

मा.नौपाडा प्रभाग समिती सभा
सभा सुचना क्र.७ दि. १५.१२.२०१०
सभा क्र. १ दि. २०.१२.२०१०

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती ____________________
सदस्य / सदस्या, नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समितीची सभा सोमवार दि. २०.१२.२०१० रोजी दुपारी ठिक १.०० वाजता नौपाडा प्रभाग समिती कार्यालयातील कै. मो. दा.जोशी सभागृहात सभा सुचना क्र. ७ दि. १५.१२.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. सुहासिनी सुनिल लोखंडे हया उपस्थित होत्या.

सभेस उपस्थित सदस्य

| | |
|---|---|
| १. सौ.सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे | अध्यक्षा |
| २. सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ३. सौ.सुजाता भास्कर पाटील | सदस्या |
| ४. सौ.अनिता हिराकांत फर्डे | सदस्या |
| ५. श्री.संजय संतु वाघुले | सदस्य |
| ६. श्री.विलास शिवराम सामंत | सदस्य |
| ७. श्री.नारायण शंकर पवार | सदस्य |
| ८. श्री.प्रकाश धोंडू पायरे | स्विकृत सदस्य |
| ९. श्री.पुंडलिक मारुती थोरवे | स्विकृत सदस्य |

सभेस गैरहजर सदस्य

| | |
|---|---|
| १. श्री.अशोक बारकु वैती | सदस्य |
| २. श्री. बिष्ट महादिप उर्फ मुन्ना | सदस्य |
| ३. सौ.शांता शामजी सोलंकी | सदस्या |
| ४. श्री.मुकुंद रामचंद्र जाधव | स्विकृत सदस्य |

सभा ठिक दुपारी ०२.०० वाजता सुरु होते.

**<u>श्री.वाघुले, प्रभाग अधिकारी, नौपाडा प्रभाग समिती,</u>**

मा.अध्यक्ष महोदयांच्या पूर्व परवानगीने अजेंडा वाचून दाखवितात.

(नौपाडा प्रभाग समितीकडील मा.अध्यक्षा सो., यांचे हस्ते सन २०११-२०१२ चे सुधारित मूळ अर्थसंकल्पिय अंदाज,-सन २०१०-२०११ चे सुधारित अर्थसंकल्पासह, उपस्थित सन्मा.सदस्य गण तसेच सहा.आयुक्त सो., श्री.मनिष जोशी साहेब यांचे मार्फत सभागृहामध्ये सादर करण्यात येतो. त्यावेळी उपस्थित सन्मा.नगरसेवकांचे फोटो काढण्यात येतात)

तद्नंतर प्रभाग अधिकारी श्री.वाघुले, यांचे मार्फत नौपाडा प्रभाग समितीकडील सन २०११-२०१२ चे सुधारित मूळ अर्थसंकल्पिय अंदाज (सन २०१०-२०११ चे सुधारित अर्थसंकल्पासह) वाचन करण्यात येते.

**श्री.विलास सामंत,सन्मा.सदस्यः**

मा.अध्यक्ष महोदया, आजच्या सभेमध्ये मा.अध्यक्ष सो., यांचे हस्ते नौपाडा प्रभाग समितीकडील सन २०११-२०१२ चे सुधारित मूळ अर्थसंकल्पिय अंदाज (सन २०१०-२०११ चे सुधारित अर्थसंकल्पासह) बजेट सभागृहामध्ये सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबतची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना मिळालेली असून सदरच्या बजेट संदर्भात चर्चा करण्याच्या अनुषंगाने माझ्या मते आपल्या नौपाडा प्रभाग समितीकडील महसुल हा मोठया प्रमाणामध्ये वसुल होऊन ठाणे महानगरपालिकेला दिला जातो. तेव्हा सदरच्या बजेटमध्ये पाणी वसुली, व करवसुली यांची वसुली किती प्रमाणात करण्यात येते याची माहितीसुध्दा सादर करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**श्री.वाघुले, प्रभाग अधिकारी, नौपाडा प्रभाग समिती,**

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समिती निहाय पान क्र.२३ वरील खर्चाचा गोषवारा वाचून दाखवितात.

**श्री.विलास सामंत,सन्मा.सदस्यः**

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समिती कार्यक्षेत्रामध्ये येत असलेल्या मार्केटच्या उत्पन्नाचा महसुल सुध्दा येथे नमूद असणे आवश्यक वाटते. कारण ठाणे महापालिकेला आमच्या नौपाडा प्रभाग समितीमार्फत एक तृतिअंश उत्पन्न हे मार्केटच्या महसुलामधून प्राप्त होते. तसेच बजेटमध्ये नमूद असलेला महसुली खर्चामध्ये दरवर्षीचा बोनस, सानुग्रह अनुदान, आस्थापना विषयक खर्च या संदर्भातील चर्चा करण्याची आवश्यकता वाटत नाही. आता पान क्र.१३ पासून जो चालु होणारा खर्च म्हणजे अत्यंत महत्वाच्या रस्ते दुरस्ती, गटार दुरुस्ती, पदपथ दुरुस्ती, तसेच लाईट दुरुस्ती, फुटपाथची/पदपथांची दुरुस्ती, त्याचप्रमाणे फुटपाथवरील झाकणे बसविणे, शाळांची दुरुस्ती. इ. बाबतचा लेखाशिर्ष हा जादा प्रमाणामध्ये मिळणे आवश्यक आहे. परंतु सदरचे बजेट हे अशा आवश्यक कामांकरीता अपूरे पडते. त्यामुळे प्रत्येक वॉर्डातील विविध स्थापत्य कामे करण्याकरीता नागरीकांना चांगल्या प्रकारच्या सोई सुविधा देण्याकरीता सदरच्या बजेटमध्ये जादा प्रमाणामध्ये वाढ करुन घेणे आवश्यक आहे. तसेच वाहनतळांच्या सगळया रस्त्यांची वाहतुक कोंडी व्यवस्थित होणेकरीता बजेटमध्ये मोठया प्रमाणामध्ये तरतूद असणे आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे शिवाजी मैदानाच्या ठिकाणी असणा-या परिसराकरीता दुरुस्ती व देखभालीचा खर्च हा ९ लाख म्हणजे हा अत्यंत कमी प्रमाणात आहे. काही ठिकाणची अत्यावश्यक कामे करण्याकरीता वाहने उपलब्ध होत नाहीत. तरी त्याकरीता ९ लाखापैकी १२ लाख रुपयांची मागणी करण्यात यावी.

**श्री.मनिष जोशी, सहा.आयुक्त, नौपाडा प्रभाग समिती,**

मा.अध्यक्ष महोदया, टोईंग वॅनचा खर्च बजेटमध्ये दाखविलेला नाही. त्या संदर्भात सन्मा.सदस्यांनी सुचना केल्यानुसार सदरच्या वाहनांकरीता सुध्दा बजेट वाढवून घेण्यात येईल.

**श्री.विलास सामंत,सन्मा.सदस्यः**

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये कमीत कमी १०० जॅमर तरी उपलब्ध असणे आवश्यक आहेत. तसेच हातगाडयांचा खर्च फेरीवाल्याच्या नियंत्रणाकरीता लागणारा खर्च हा १२ लाख रुपये वाढवून घेण्यात यावा. त्या संदर्भातील जस्टिफिकेशन आम्हाला कळलेले नाही. त्यावर जास्त चर्चा करणे आवश्यक वाटत नाही. तसेच सदरचे १२ लाख हे नक्की कशासाठी खर्च होणार आहेत त्या संदर्भात जस्टिफिकेशन देण्यात यावे. तसेच आतापर्यंत १५ लाख अनधिकृत बांधकामांच्या नियंत्रणाकरीता वाढविले पाहिजे.

काही प्रमाणात बरेचशे बिल्डर्स हे फुटपाथवर अतिक्रमण करीत आहेत त्या दृष्टीकोनातून १५ लाख ऐवजी येथे २० लाख वाढीव मागणी करण्यात यावी. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावयाच्या कामांकरीता रस्ते दुरुस्तीसाठी ६० लाख हे कमी पडत असतात. त्यामध्ये रस्त्यांचे WBM पध्दतीने काम करणे आवश्यक असते. तरी रस्त्यांकरीता सुध्दा वाढीव बजेटची मागणी मा.आयुक्त सो., यांचेकडून करुन घेण्यात यावी. तसेच अनेक ठिकाणी सि.एन.जी. गॅस लाईन टाकण्याचे काम चालु असते, तसेच एम.एस.सी.बी. विभागामार्फत विद्युतचे केबल्स टाकण्याचे काम चालु असते सदर कामाकरीता रस्ते खोदण्यात येतात. परंतु पुन्हा रस्त्यांची डागडुजी केली जात नाही. तरी सदरच्या रस्त्यांची तातडीने डागडूजी करणेकरीता रुपये ६० लाखापैकी ७५ लाखाची मागणी बजेटमध्ये करुन घेण्यात यावी. तसेच रस्त्यांचे मार्किंग/ पेन्टिंग/ फलक लावणेकरीता सुध्दा जादा निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा. आता सद्यस्थितीमध्ये सांगावयाचे झाले तर.. गोखले रोड येथील रस्त्यावरील डिव्हायडर हा अत्यंत धोकादायक झाले आहे. कारण रात्रीच्या वेळेमध्ये वाहनांच्या वेगाने धडकून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर परिसरामधील डिव्हायडर तातडीने करुन घेण्यात यावा. तसेच झेब्रा क्रॉसिंगचे पेंन्टिंग करणेकरीता वाढीव निधी मागवून घेण्यात यावा. सद्यस्थितीमध्ये आताचे पेन्टिंग केले झेब्रा क्रॉसिंगचा रंग हा दोन दिवसांमध्ये निघून जातो त्यामुळे पादचा-यांना रस्ता ओलांडतांना अपघात होवू शकतो. कारण नौपाडा प्रभाग समितीच्या हदिद्मधील ब-याचशा रस्त्यावरुन वयोवृध्द नागरिक, तसेच शाळेची लहान मुले सतत ये-जा करीत असतात. त्यांचे अपघात होवू नयेत याकरीता विशेषतः रस्त्यांवर झेब्रा क्रॉसिंगचे पेन्टिंग करण्यात यावेत. तसेच राममारुती रोड, घंटाळी, गोखले रोड या ठिकाणचे रस्ते योग्य रित्या पेन्टिंग झाले पाहिजेत. त्याकरीता ३० लाख ऐवजी ४० लाख रुपये बजेटमध्ये वाढीव तरतूद करुन घेण्यात यावी. तसेच सदरच्या निधीचा सदुउपयोग सुध्दा करुन घेण्यात यावा. त्याचप्रमाणे फुटपाथ दुरुस्ती करीता ४० लाख हे अतिशय कमी प्रमाणात आहेत. कारण सध्या वॉर्डांमध्ये रिलायन्स, टाटावाले, गॅसवाले यांचे मार्फत नव्याने लाईन टाकण्याची कामे नेहमीच चालु असतात. त्यामुळे सदरचे फुटपाथ उखडले जातात. त्या ठिकाणी अनेक वेळेला फुटपाथमधून घुशींचे साम्राज्य वाढत जाते आणि संपूर्ण फुटपाथ पुर्णतः उखडला जातो. त्या दृष्टीकोनातून फुटपाथ दुरुस्तीकरीता सुध्दा ६० लाख रुपये वाढीव निधी मिळणे आवश्यक आहे.

**<u>श्री.नारायण पवार, सन्मा.सदस्य:</u>**

मा.अध्यक्ष महोदया, वाढीव बजेट करीता मागणी केलेले प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने तयार करुन घेण्यात यावेत.

**<u>श्री.विलास सामंत,सन्मा.सदस्य:</u>**

मा.अध्यक्ष महोदया, आपल्या नौपाडा प्रभाग समितीमार्फत जादा प्रमाणामध्ये महसुल मिळत असल्यामुळे आमच्या प्रभागातील कामे करण्याकरीता दारीद्रय दाखवू नका परंतु सदरच्या वाढीव निधीचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच ज्या प्रकारे प्रभागांतील कामे करणारे कॉन्ट्रॅक्टर बदलतात त्या प्रकारे गटारांची लांबी, रुंदी बदलते त्यामुळे प्रत्येक वॉर्डातील कामे कामे करताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबतचा अनुभव आम्हाला नेहमीच येत असतो. तसेच फुटपाथवरील झाकणे चोरीला जातात त्या संदर्भात संबंधित पोलिस स्टेशनला भंगारवाल्यांच्या तक्रारी नोदविल्या जातात. आता अशी झाकणे चोरी करणारे हे ठेकेदार सुध्दा असू शकतात यात शंका नाही. आणि असे प्रकार माझे निदर्शनास ब-याच वेळेला घडलेले आहेत. त्यांची नावे सुध्दा मी सभागृहामध्ये देवू शकतो. तरी गटारांवरील झाकणे बसविणेकरीता १० लाख ऐवजी २५ लाख करण्यात यावी. आणि गटार दुरुस्तीकरीता ५ लाख ऐवजी १० लाख करण्यात यावे. त्याचप्रमाणे नौपाडा प्रभाग समिती हदिद्मधील नाले दुरुस्ती करीता तसेच नविन नाल्यांची दुरुस्ती करण्याकरीता जादा निधी उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. सदरचे नाले हे शाळा, कॉलेज, परिसरापासून ते भंडारआळी पर्यंतच्या अस्तित्वात असलेल्या नाल्यांची दुरुस्ती झाली पाहिजे. त्याचप्रमाणे रंगरंगोटीची किरकोळ कामे, बाग बगिचा, यांची कामे करण्याकरीता वाढीव निधी मिळणे आवश्यक आहे. आज काही वॉर्डांमध्ये बागबगीचे सुंदर रित्या बनविण्यात आलेले आहे परंतु त्या ठिकाणी विद्युतीकरणाची कामे सुध्दा झाली पाहिजेत. सदरची कामे करण्याकरीता बजेटमध्ये वाढीव निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा. तसेच विद्युत विभागाचे सर्वात महत्वाची कामे करुन घेण्यात यावीत. तसेच आज हायड्रोलिक सिडी आपणाकडे एकच असल्यामुळे सदरची गाडी नौपाडा प्रभाग समितीकरीता मागविणे आवश्यक आहे. रस्त्यावरील दिवा खर्च इलेक्ट्रिक बिल याकरीता १५ लाख कमी आहेत त्यामध्ये आमच्याकडे ब-याच वेळेला पावसाळयामध्ये रस्त्यांवर पाणी साचून विद्युतचे पोल गंजून जातात, सडून जातात त्याकरीता विद्युत विभागांचे पोल सुध्दा तातडीने करुन घेणे आवश्यक आहे.

**श्री.गुप्ता, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग,**

मा.अध्यक्ष महोदया, आपल्या नौपाडा प्रभाग समितीच्या सभागृहामध्ये AC लावण्याकरीता १० लाख रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. सदरचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

**श्री.विलास सामंत,सन्मा.सदस्य:**

मा.अध्यक्ष महोदया, आपल्या नौपाडा प्रभाग समितीच्या इमारतीकरीता लिफ्टची सोय करणे आवश्यक आहे. तसेच कोपरी प्रभाग समितीच्या कार्यालयाकडील इमारतीला लिफ्ट बसविण्यात आलेली असून आपल्या नौपाडा प्रभाग समिती कार्यालयाच्या इमारतीकरीता सुध्दा लिफ्ट बसविण्याची तरतूद करुन घेण्यात यावी. तसेच नौपाडा प्रभाग समिती कार्यालयाकडील प्रशासकिय इमारतीच्या खाली चहावाले बसतात, वडापाव वाले बसतात, सदरचे गाळेधारक नियमत महसुल देतात. त्यामुळे नौपाडा प्रभाग समितीच्या कार्यालयाकडील विविध स्थापत्य कामे ही झाली पाहिजेत. तसेच नविन प्रशासकिय इमारत सुध्दा बनविण्याबाबत विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण एकाच इमारतीमध्ये विविध खात्यांचे विभाग असतात, त्यामध्ये गाळेधारक सुध्दा असतात. त्यामुळे नौपाडा प्रभाग समितीकरीता स्वतंत्र इमारत बांधण्याकरीता निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा. तसेच आपल्या प्रभाग समितीच्या कार्यालयाच्या इमारतीखाली जे वडापाव वाले बसतात ते नास्ता पुरवितात सदरचे गाळेधारक हे चांगल्याप्रकारे तेल वापरतात का? कारण सदरच्या परिसरामधूनच घाणीचे साम्राज्य सुध्दा मोठया प्रमाणात असल्याचे आढळून येते. त्याकरीता नव्याने इमारत दुरुस्ती करीता १० लाखा ऐवजी १५ लाख करुन घेण्यात यावी. तद्नंतर पान क्र.१६ इतर खर्चाबाबत वाचन करण्यात येते. आता संकिर्ण मध्ये नमूद केल्यानुसार आपत्कालिन परिस्थिती उद्भविल्यास मुबलक प्रमाणामध्ये निधी उपलब्ध करुन घेणे आवश्यक असतो. त्याचप्रमाणे मागच्या काही वर्षापूर्वी २६ जुलै २००५ रोजी पूर आला होता. तेव्हा संबंधित गाळेधारकांचे, झोपडीधारकांचे अतोनात नुकसान झाले होते त्यांना ठाणे महानगरपालिकेकडून संसाराची भांडी व इतर साहित्य उपलब्ध करुन देणे करीता मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आली होती. तेव्हा सदरचे साहित्य संबंधितांना देण्यात पुरविण्यात आले किंवा नाही. तेव्हा सदरचे साहित्य तातडीने वाटप करुन टाकणे आवश्यक आहे. तसेच आपल्या नौपाडा प्रभाग समितीमध्ये श्री.मनिष जोशी साहेब, सहा.आयुक्त म्हणून आलेले असून त्यांचे काम खरोखरच चांगले आहे. ते खूप चांगले काम करीत आहेत. तेव्हा त्यांना अशी विनंती आहे की, महापालिकेमार्फत घरघंटी व शिलाई मशिनचे वाटप करण्यापेक्षा मागच्या २६ जुलै रोजी वाटप करण्यात येणारे साहित्य प्रथम प्राधान्याने संबंधितांना पुरविण्यात यावेत. तसेच आस्थापना खर्च, प्रशासकिय खर्च याबाबतची चर्चा करणे आवश्यक वाटत नाही. आता पान क्र.२० मध्ये नमूद केल्यानुसार मलःनिसारण विभागामार्फत करावयाची कामे झाली पाहिजेत. त्यामध्ये संडास, मुता-यांची दुरुस्ती, शौचालयांचे दरवाजे, कडी कोयंडे इ. यांची दुरुस्तीची कामे झाली पाहिजेत. तसेच जेटिंगची गाडी दुरुस्ती करीता गेली असल्यास पुन्हा गाडी उपलब्ध होत नाही. त्या संदर्भात श्री.वैरागी साहेब यांनी मेन्टेनंन्सचे कामकाज पाहून घ्यावे. तसेच आमच्या वॉर्डाकरीता देण्यात आलेली जेटिंगची गाडी आमच्याच वॉर्डमध्ये पुरविण्यात यावी. तसेच जलकुंभांची दुरुस्ती सुध्दा नियमितरित्या झाली पाहिजे. त्याकरीता ३० लाख रुपये वाढवून घेण्यात यावेत. तसेच मलःनिसारणाच्या येणा-या, जाणा-या वाहिन्यांची सुध्दा दुरुस्ती करण्यात यावी. त्याकरीता जादा निधी असणे अत्यंत आवश्यक आहे.

**श्री.गवळी, कनिष्ठ अभियंता, ड्रेनेज विभाग :**

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये येणा-या एकूण १०० वाहिन्यांची दुरुस्ती करुन घेण्याचे काम प्रस्तावित आहे.

**श्री.विलास सामंत,सन्मा.सदस्य:**

मा.अध्यक्ष महोदया, श्री.गवळी यांना विचारणा करण्यात येते की, तुम्ही अशा कामांना किती रुपये निधी खर्च करता या संदर्भात अचूक माहिती देण्यात यावी तसेच निधीचा विनियोग चांगल्याप्रकारे करण्यात यावा. तसेच या संदर्भात मी कोणावरही आरोप करीत नसून सद्यस्थितीबाबत चर्चा करीत आहे. तेव्हा सदरचा निधी हा नेमका कोण-कोणत्या कामांकरीता वापरण्यात येतो याबाबतची माहिती सदस्यांना देणे आवश्यक आहे. तसेच विहिरींची नियमितरित्या साफसफाई होत नाही त्याकरीता ३ लाख रुपये वाढवून घेण्यात यावेत. तसेच आम्ही सांगितलेल्या विहिरींची म्हणजेच साईबाबा मंदिर परिसराजवळ अस्तित्वात असलेल्या झोपडी शेजारील विहिर कित्येक वर्षापासून नादुरुस्त अवस्थेमध्ये आहे. तरी सदरच्या विहिरीची साफसफाई योग्यरित्या करुन घेण्यात यावी. आता पान क्र.१८ मध्ये नमूद केल्यानुसार वाढीव नगरसेवक निधी सुध्दा उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

**श्री.नारायण पवार, सन्मा.सदस्य:**

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्य श्री.विलास सामंत हे जेष्ट नगरसेवक आहेत तेव्हा त्यांनाचा आजच्या सभेमध्ये बोलू देण्यात यावे.

**श्री.विलास सामंत,सन्मा.सदस्य:**

तद्नंतर मा.अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बजेटवरील पान क्र.२१ चे वाचन करण्यात येते. त्यामध्ये टॅन्करने पाणी पुरवठा करुन घेणेकरीता अत्यावश्यक बाब म्हणून जादा निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा. तसेच आतापर्यंत सोसायटयांमधून जादा निधी वसुल करुन घेण्यात येतो. त्यानुसार २ लाख निधी अत्यावश्यक कामांकरीता करुन घेण्यात यावा. तसेच वॉलचे पाणी शाळा, कॉलेजेस मधील विद्यार्थ्यांना पिण्याकरीता शुध्दीकरण करुन उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच यापुढील चर्चा जेष्ट नागरसेवक श्री.नारायण पवार हे स्पष्टीकरण देतील. आता आरोग्य खात्याचे काम करताना ते योग्य रित्या करीता नाहीत अशा प्रकारच्या वारंवार तक्रारी वॉर्डातील नागरिकांमार्फत येत असतात. त्याचप्रमाणे फायलेरिया विभागामार्फत धूरफवारणी व औषध फवारणी नियमित रित्या प्रत्येक वॉर्डामध्ये करण्यात यावी. त्या संदर्भात सभेच्या बैठकिला स्वच्छता निरिक्षकांना सुध्दा बोलाविण्यात यावे. म्हणजे त्यांनी केलेल्या सुचनेनुसार आमच्या वॉर्डातील कामे सुध्दा करणे क्रमप्राप्त होईल.

**श्री.नारायण पवार, सन्मा.सदस्य:**

मा.अध्यक्ष महोदया, आताच्या बजेटच्या मिटींगीमध्ये सन्मा.सदस्य, जेष्ट नगरसेवक श्री.विलास सांमत साहेब यांनी बजेट संदर्भात संपूर्ण विश्लेषण करुन दिलेले आहे. त्यांनी मांडलेले मुदद् खरोखर योग्य असून त्यानुसार आपल्या बजेट मध्ये वाढीव निधीची तरतुद करुन घेण्यात यावी. तसेच दरवर्षीप्रमाणे अतिक्रमण विभागाच्या कारवाई करीता भाडयाने वाहन मागविण्यात येतात. तेव्हा सदरचे वाहन हे महापालिकेकडे स्वतःचे वाहन असणे आवश्यक आहे. तसेच काही वॉर्डामध्ये अनधिकृत बांधकाम झाले असताना १५ दिवसांची नोटीस संबंधीतांना बजाविण्यात येते. सदरच्या नोटीसा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६०, २६७ अन्वये संबंधित अनधिकृत बांधकामधारकांना बजाविण्यात येतात. त्यामध्ये असे नमूद करण्यात येते की, १५ दिवसाचे आंत त्यांनी केलेले अनधिकृत बांधकाम हटवून घेण्यात यावे अन्यथा महापालिका सदरचे अनधिकृत बांधकाम तोडून टाकेल व त्यापोटी झालेला खर्च संबंधित अनधिकृत बांधकामधारकामार्फत वसुल करण्यात येत असे वारंवार नोटीसी मध्ये सांगण्यात येते. परंतु सदरची कारवाई नियमितरित्या होते का? या संदर्भात आमच्या पक्षाचे विरोधी पक्ष नेता श्री.नजिब मुल्ला साहेब यांनी अनधिकृत बांधकामासंदर्भात वारंवार मा.महासभेमध्ये प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यानुसार महापालिका कोण-कोणती कारवाई करीत असते. याबाबतचे विश्लेषण येथे झाले पाहिजे. तसेच काही अधिकारी यांना काही अनधिकृत बांधकाम तोडण्याच्या कारवाईमध्ये दोषी ठरविण्यात येते. उदाः श्री.वाघ साहेब, वागळे प्रभाग समितीकडील सहा.आयुक्त यांना तर.. सक्तिच्या रजेवर पाठविण्यात आलेले आहे. अशा प्रकारची कारवाई ही योग्य नाही. तसेच सद्यस्थितीबाबत सांगावयाचे झाले तर.. काही ठिकाणी अनधिकृत रित्या बिल्डींग यापूर्वीच उभारण्यात आलेल्या असतात. सदरच्या बिल्डींगीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यांना नोटीसी लावण्यात येतात अशा नोटीसींना अर्थ नाही. तसेच काही वॉर्डामध्ये अनधिकृत बांधकामे ही मुळापासून तोडण्यात यावीत जेणेकरुन पुन्हा-पुन्हा अनधिकृत बांधकाम होणार नाहीत याबाबत महापालिकेने अंकुश ठेवले पाहिजेत. आता रस्त्याच्या दुरुस्ती संदर्भात बोलावयाचे झाले तर रस्त्यांकरीता ६० निधी पुरणार नाही. सदरचा निधी वाढवून घेण्यात यावा. तसेच महापालिकेमार्फत अत्यावश्यक कामे करणे आवश्यक असते अशा प्रकारची अत्यावश्यक कामे तातडीने, तत्परतेने झाली पाहिजेत. त्याचप्रमाणे आज काही वॉर्डामध्ये पाहणी केली असता, असे आढळून येते की, जागो-जागी घाणीचे साम्राज्य पसरलेले असून वॉर्डातील कचरा नियमितरित्या उचलला जात नाही. तसेच अत्यावश्यक सेवा म्हणून पाण्याचा प्रश्न येतो त्याकरीता निधी उपलब्ध झाला पाहिजे. तसेच रस्त्यांची, फुटपाथची दुरुस्तीची कामे, गटारांवरील झाकणे बसविण्याची कामे तातडीने करुन घेणेकरीता निधी मिळाला पाहिजे. तसेच एखादया रस्त्यावरील कोणतेही काम विकासकामार्फत करुन घेण्याचे नियोजन असते किंवा संबंधित ठेकेदारामार्फत रस्त्याची कामे करुन घेण्याचे चालु असते. त्या ठिकाणी रस्त्यांवर सुचना फलक, बोर्ड वगैरे लावणे आवश्यक आहे. सदरच्या सुचना फलकावर संबंधित ठेकेदाराचे नांव, व सदरचे काम किती कालावधीमध्ये पूर्ण होणार आहे याबाबतची माहिती लिहिणे आवश्यक असते. तसेच काही वॉर्डातील कामे करताना काही पक्षाच्या नेत्यांमार्फत अंदोलने केली जातात. उदाःमनसेच्या दणक्याने संबंधित विभागाच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले अशा प्रकारच्या बातम्या वारंवार येत असतात. तेव्हा आमच्या मते आम्ही नगरसेवक सुध्दा आमच्या पत्राद्वारे प्रशासनाकडे वारंवार विनंती अर्ज करीतच असतो. त्यानुसार तरी कामे झाली पहिजे. उगाचच कोणताही पक्ष काही कामांचे श्रेय घेत असतात. आता सभागृहामध्ये ज्याचे वक्तृत्व चांगले असते त्याचेच ऐकले जाते. बाकिच्या

नगरसेवकांचे म्हणणे कोणीही ऐकंत नाही याला काही अर्थ आहे का? तसेच आजच्या स्थितीमध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिका हदिद्मधून मनसेचे दोन आमदार निवडून आलेले आहेत. परंतु त्यांनी आतापर्यंत केलेल्या कामाची अहवाल त्यांच्याकडून कोणी मागविला का? तसेच संबंधित पक्षाच्या नेत्यांच्या बॅनर्सवर अतिक्रमण विभागाची कारवाई झाली पाहिजे.

**<u>श्री.वाघुले, प्रभाग अधिकारी, नौपाडा प्रभाग समिती:</u>**

मा.अध्यक्ष महोदया, बॅनर्स व पोस्टर्सवर अतिक्रमण विभागामार्फत नियमित कारवाई करण्यात येते.

**<u>श्री.नारायण पवार, सन्मा.सदस्य:</u>**

मा.अध्यक्ष महोदया, रस्त्यांचे झेब्रा क्रॉसिंगवर स्पिड ब्रेकरर्सना रंगरंगोटी करणे आवश्यक आहे जेणेकरुन पादचा-यांचा रस्ता ओलांडताना अपघात होणार नाही. या संदर्भात जेष्ठ नगरसेवक श्री.विलास सामंत साहेब यांनी सविस्तर सुचना केली असून त्यानुसार कामे झाली पाहिजेत. सदर कामाकरीता रुपये ३० लाख खर्च केला जातो परंतु ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने करुन दाखविली पाहिजेत. आज आपला भारत देश हा अमेरीकेच्या बरोबरीने महासत्ता म्हणून उदयास येत आहे तेव्हा नागरी सुविधांची कामे सुध्दा तत्परतेने झाली पाहिजेत. त्या दृष्टीकोनातून ठाणे शहराचा विकास सुध्दा योग्य प्रकारे झाला पाहिजे आज आपली ठाणे महानगरपालिका ही १५०० कोटी रुपयांचे मोठे बजेट असलेली महापलिका म्हणून देशात गणली जाते. तेव्हा सदरच्या शहराच्या विकासाची कामे सुध्दा मोठया प्रमाणामध्ये झाली पाहिजेत. आता माझ्या मते पुन्हा एकदा सांगावयाचे झाले तर.. MTNL वाले, MSEB वाले कधीही खोदतात त्यांना काही नियंत्रणच नाही. तसेच आज आमच्या वॉर्डामध्ये कोंबडयांचा वास किती येतो. तसेच नियमानुसार गटार उघडे ठेवले पाहिजे त्याचेवर स्लॅप टाकू नयेत. तरी सुध्दा गटारांवर स्लॅब टाकून गटारे बंद अवस्थेत करण्यात येतात. आणि पावसाळयामध्ये पाण्याचा निचरा योग्य प्रकारे न झाल्यामुळे गटारे तुंबून जातात. तसेच उघडयावर पडलेले पेव्हर ब्लॉक जागोजागी खचल्यामुळे पेव्हर ब्लॉक सुध्दा आंतमध्ये गटारामध्ये गेलेले आहेत. तसेच सेन्ट्रींगचे गटार चॉकअप झालेले असते. त्याची दुरुस्ती झाली पाहिजे. त्याकरीता गटारांचे लेवलिंग सुध्दा बघितले पाहिजे. तसेच ड्रेनेजच्या संदर्भात सुध्दा हजारो नागरिकांच्या तक्रारीसंदर्भात आम्ही वारंवार सांगत आलेलो आहोत. तसेच जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता आम्ही सभागृहामध्ये पाच वर्षाकरीता जनतेमार्फत आम्हाला फक्त ५ वर्षाकरीता निवडून दिलेले असते. नागरिकांच्या तक्रारी आम्ही सभागृहामध्ये योग्य प्रकारे मांडू शकलो नाही तर.. पुढच्या निवडणूकीमध्ये आम्हाला कोणीही विचारीत नाही असे प्रकार होत असतात. परंतु महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी हे वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत राहून महापालिकेचा कारभार चालवित असता, त्यामुळे त्याचा फायदा फक्त संबंधित ठेकेदारांनाच होतो अशी सद्यस्थिती आहे. तरी ठाणे शहराचा सुध्दा विकास मोठया प्रमाणामध्ये झाला पाहिजे. तसेच आरोग्य विषयक जनजागृती करुन आरोग्य विभागाला केंद्र सरकारमार्फत मोठया प्रमाणामध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. जेणेकरुन प्रत्येक वॉर्डातील गोरगरीब जनतेला मुबलक प्रमाणामध्ये तसेच स्वस्त दरामध्ये औषधे उपलब्ध होतील. परंतु आज अशी स्थिती आहे की, आरोग्य विभागामार्फत सुध्दा निधीचे योग्य प्रकारे नियोजन होत नाही.तसेच आज ठाणे शहरामध्ये कच-याचे साम्राज्य मोठया प्रमाणात वाढत असून कचरा डंपिंग करण्याकरीता ठाणे महापालिकेकडे जागा उपलब्ध नाही अशा प्रकारच्या अनंत तक्रारी येथे ठाणेकर जनतेला भेडसावत आहेत. त्याबाबत सुध्दा विचार व योग्य तो निर्णय प्रशासनाने घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये सांगावयाचे झाले तर.. आजा चेन्नईमध्ये संबंधित अधिका-यांनी जाऊन पहावे की, तेथे अद्यापपर्यंत काही ठिकाणच्या रस्त्यांवर अनधिकृतरित्या पानाची साधी टपरी सुध्दा उभारलेली नसते. आणि त्या मानाने आज ठाणे शहराचा विचार केलात तर.. जागो जागी पानाच्या, गुटक्याच्या टप-या उभारलेल्या आढळून येतील. त्यांचेवर अतिक्रमण विभागाने कारवाई नियमित केली पाहिजे. तसेच काही वॉर्डांमध्ये रॅबिटवर कचरा टाकला जातो त्यावर अंकूश आणले पाहिजेत. तसेच चौकांमध्ये विविध प्रकारच्या गार्डन, उद्यानांमध्ये सुशोभिकरण करण्यात येते. परंतु काही वेळेस पाण्याच्या कारंज्यांचे सुशोभिकरण करण्याऐवजी तेथे गटारांच्या मलःनिसारणाच्या पाण्याचे फवारेच्या फवारे उडताना जागोजागी दिसून येतील. अशा प्रकारे ठाणे शहराचा विकास महापालिका करणार आहे का? तरी याबाबत महापालिकेने योग्य ती कार्यवाही करुन वॉर्डातील साफसफाई तसेच मलःनिसारणाची कामे, कुपनलिकेची कामे तातडीने करुन घेण्यात यावीत. तसेच काही गार्डन व उद्यानांमध्ये आज वयोवृध्द नागरिक बसण्याकरीता येत असतात. तसेच तेथे नाना-नानी पार्कची व्यवस्था महापालिकेने केलेली आहे परंतु तेथे नाना-नानी बसतच नाही भलतेच लोक तेथे बसुन टवाळया करीत असतात अशा प्रकारची दुरावस्था आज उद्यानांची झालेली आहे. तसेच गार्डन मध्ये झाडांना लाल माती पुरविणे आवश्यक असताना तेथे माती पुरविण्यात येत नाही. शौचालयांच्या कडया कोयंडया नियमित दुरुस्ती होत नाहीत. तरी शौचालयांच्या साफसफाई करीता व दुरुस्ती देखभाली करीता सुध्दा मोठया प्रमाणामध्ये निधी

उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आज महापालिकेकडे मोठया प्रमाणात कराच्या रुपाने महसुल मिळतो परंतु त्यांचा उपयोग अशा अत्यावश्यक कामांना होत नाही. तसेच लाईट फिटींगकरीता सुध्दा वारंवार नागरिकांच्या तक्रारी येत असतात. कित्येक ठिकाणचे विद्युत पोल बंद अवस्थेत असतात. तरी सदरचे पोल सुध्दा चालु करुन देणे आवश्यक आहेत. तसेच मा.महासभेमध्ये त्याचप्रमाणे स्थायी समितीमध्ये श्री.सावंत साहेब हे कळवा हॉस्पिटल करीता मोठया प्रमाणामध्ये औषधे उपलब्ध करुन घेतात. परंतु गोर-गरीब जनतेला सदरची औषधे उपलब्ध करुन दिली जात नाहीत. आज कळवा हॉस्पिटल मध्ये सिटी स्कॅन तर.. ३-३ महिने झाले सदरची मशिन बंद अवस्थेत असल्यामुळे गोर-गरीब गरजू नागरिकांचे अतोनात हाल होत आहेत. तेव्हा सदरची कामे ही झाली पाहिजे यासंदर्भात आम्ही वारंवार मा.महासभेमध्ये बोलत असतो. परंतु कामे काही होत नाहीत.

**<u>श्री.वाघुले, प्रभाग अधिकारी, नौपाडा प्रभाग समिती:</u>**

मा.अध्यक्ष महोदया, खेळाची मैदाने तयार करण्यात आलेली आहेत परंतु सदर मैदानांमध्ये मुरुम तसेच झाडांकरीता लाल माती मिळत नाही. तरी सदरच्या मैदानांकरीता लाल माती तसेच वाळू इ. पुरविणे आवश्यक आहे. आजच्या सभेमध्ये उपस्थित सन्मा. नगरसेवक तसेच ज्येष्ठ नगरसेवक श्री. विलास सामंत सो. यांनी मांडलेल्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**<u>सौ.सुहासिनी लोखंडे, मा.अध्यक्षा, नौपाडा प्रभाग समिती:</u>**

संबंधित अधिका-यांना सांगण्यात येते की, आजच्या सभेमध्ये उपस्थित सन्मा.नगरसेवक, तसेच जेष्ट नगरसेवक श्री.विलास सामंत साहेब यांनी बजेट संदर्भात चांगल्याप्रकारे विश्लेषण केलेले असून, सदरच्या वाढीव बजेटची अंमलबजावणी प्रशासनाने तातडीने करुन घेण्यात यावी व जनतेची अत्यावश्यक कामे करुन देण्यात यावीत.

प्रकरण क्र. ९४ ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीचे सन २०१० - २०११ चे सुधारित व सन २०११ - २०१२ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजावर चर्चा करणे व मंजुरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र. ९९, दि. २०.१२.२०१०**

**<u>ठ रा व</u> :-**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. नौपाडा प्रभाग समितीचे सन २०१० - २०११ चे सुधारित व सन २०११ - २०१२ चे मुळ अंदाज मंजुर करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सदर सभेमध्ये साधक - बाधक चर्चा करण्यात येऊन सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेसह ही समिती सन २०१० - २०११ चे सुधारीत व सन २०११ - २०१२ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देत असुन, सदरचे अंदाजपत्रकास मा. आयुक्त सो. ठाणे महानगरपालिका यांची मंजुरी मिळणेसाठी ही समिती शिफारस करीत आहे.

सुचक :- श्री. विलास शिवराम सामंत　　　　अनुमोदक :- श्री.संजय संतू वाघुले

सर्वानुमते मंजूर

सही/ सौ. सुहासिनी लोखंडे,
अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

(तद्नंतर ४.०० वाजता सदरची सभा संपल्याचे मा.अध्यक्ष महोदय घोषित करतात.)

उप कार्यालयीन अधिक्षक / सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.